स्वच्छ गांव ! निर्मल ग्राम !! सुंदर गांव !!!



# गट ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)



## पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपूर

| सरपंच | उपसरपंच | सचिव |
|---|---|---|
| श्री. सचिन कृष्णराव इंगळे | श्री. आकाश ज्ञानेश्वर पिसार | श्री. सचिन बी. खोडे |

**सदस्य गण**

श्री. प्रभाकर बापुराव काळबांडे

सौ. सोनाली सतिश सेलकर

सौ. कविता पिंटु ठाकरे

सौ. शालिनी राजु थुल

सौ. माधुरी पुरुषोत्तम बोधनकर

सौ. प्रियंका छत्रपाल पाटील

जावक क्र. ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र) आ./जा. 324
दिनांक दि: 23/08/2022
पं.स.ता.जि. नागपूर

प्रती,

श्रीनाथ डेव्हलपर्स अँड बिल्डर्स तर्फे
विजय बोरुंदीया व मच्छिन्द्र कदम
रा. प्लॉट नं. ४०२,दया चेंबर,अजनी चौक
वर्धा रोड , नागपूर ४४००१५

विषय: मौजा शंकरपूर ख. क्र. ७६/३ मधील मंजूर रहिवासी ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्याबाबत.

संदर्भ: १) श्रीनाथ डेव्हलपर्स अँड बिल्डर्स तर्फे विजय बोरुंदीया व मच्छिन्द्र कदम यांचा दिनांक १५/०२/२०२२ रोजीचा अर्ज.

२) मा. कार्यकारी अभियंता (मेट्रो) विभाग सदर नागपुर व मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना ग्रा. पं. चे पत्र जा. क्र २८४ दिनांक १८/०७/२०२२ अन्वये.

३) मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. सहा. अभि. (द) / ९९३ दिनांक ०८/०८/२०२२ अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की आपल्या अर्जानुसार व मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. सहा. अभि.(द) ९९३ दिनांक ०८/०८/२०२२ रोजीचे पत्रानुसार मौजा शंकरपूर ख. क्र. ७६/३ तह. नागपुर (ग्रामीण) या अभिन्यासाचा विकास करारनामा दिनांक २१/१२/२०२० रोजी निष्पादित झालेला आहे. विकास करारनामा मधील अट क्र. १७ नुसार विकासकाने अभिन्यासात मलवाहिका, पर्जन्यवाहिका , पिण्याची पाण्याची वाहिनी , सीमेंट कॉक्रीट रस्ते , खुल्या जागेस संरक्षण भिंतीचे बांधकाम व मल – जल शुद्धीकरण संयंत्राचे बांधकाम मंजूर विकास नकाशानुसार पूर्ण केलेले आहे तथापी मलजल शुद्धीकरण संयंत्राचे भविष्यात देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत दिनांक ०१/०८/२०२२ चे हमीपत्र सादर केलेले आहे. असे पत्रात नमूद आहे. वरील विकास कामे अर्जदाराने पूर्ण केल्यामुळे व ना. म. प्र. वि. प्रा. सहायक अभियंता (दक्षिण) यांचे पत्राचे आधीन राहून सदर विकास कामाची देखभाल व दुरुस्ती यापुढे ग्रा.पं. करण्यास तयार आहे. पण तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे, कर आकारणी करून देणे लेआऊट धारकावर बंधनकारक राहील अन्यथा ले आऊट धारकानांच टॅक्स भरणा करावा लागेल तसेच ले आऊट मध्ये मोक्यावर पूर्ण वसाहत तयार होईपर्यन्त व लेआऊट मालक यांनी सादर केलेल्या १०० रुपयेचा मुद्रांक नंबर १५ AA १७०६१८ दिनांक १०/०८/२०२२ चा खरेदी दिनांक ११/०८/२०२२ चा स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेल्या हमीपत्रात नमूद बाबीची देखभाल व दुरूस्ती ले आऊट मालकाची राहील. तसेच ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार / ले आऊट धारक यांची राहील. ग्राम पंचायतची जबाबदारी राहणार नाही. तसेच ले आऊट मध्ये प्लॉटवर फ्लॅटस्कीम होणे नाकारता येत नाही.

वरील अटी व शर्तीच्या आधीन राहून व विविध शासकीय विभागाच्या अटी व शर्तीच्या आधीन राहून ग्राम पंचायत फ्लॅट स्कीम वगळून सदर लेआऊट अभिन्यास हस्तांतरित करण्यास तयार आहे.

करिता सविनय महितीस सादर.

सरपंच / सचिव
ग्रामपंचायत वेळा (हरिश्चंद्र)
पं. स. नागपूर.

जय जवान ... जय किसान ... जय विज्ञान ...

# प्रोसीडिंग बुक (कारवाई बुक)

ग्रामपंचायत – वेळा (हरिश्चंद्र) तहसील – नागपूर जिल्हा – नागपूर सन २०२२-२३

| नंबर सभेच्या दिनांक व तारीख | हजर सभासदांची नावे | ठरावा च्या मसुदा | सूचक / अनुमोदन | थोडक्यात चर्चा | विरोधकांची संख्या व सही | तटस्थाची संख्या व सही | ठराव पास किंवा नापास | सचिवांचे मत | अधिकाऱ्यांचीसही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८/०८/२०२२ | श्री सचिन कृष्णराव इंगळे सरपंच व हजेरी रजिस्टर प्रमाणे उपस्थित ग्रा.पं.सदस्य | ठराव क्र. ८/३ येणाऱ्या अर्जावर विचार विनिमय करणे. | | मासिक सभा दिनांक – १८/०८/२०२२ वेळ - सकाळी ११:०० वाजता<br>ठराव क्र. ८/३: मौजा शंकरपूर ख. क्र. ७६/३ मधील मंजूर रहिवास्याचे अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज व मा.सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्राचे अनुषंगाने.<br>**खुलासा** :- वरील विषयानुसार आजच्या सभेत श्रीनाथ डेव्हलपर्स अँड बिल्डर्स तर्फे विजय बोरुंदीया व मच्छिंद्र कदम यांचा मौजा शंकरपूर ख. क्र. ७६/३ ले आउट मधील मंजूर रहिवासी अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज प्राप्त झाला असून सदर अर्जाचे अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता (मेट्रो) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सदर नागपुर तसेच सहायक अभियंता (द) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हनुमान नगर झोन नागपूर यांना मौजा शंकरपूर ख. क्र. ७६/३ या ले आऊट मधील आपल्या सोबत केलेल्या करारनामा क्र. E.E./NMRDA/DPC/Agree/३५३ दि. २१/१२/२०२० नुसार केलेल्या करारनामाप्रमाणे सुविधा पूर्ण झाले की कसे ? याबाबत अभिप्राय मागविण्याबाबत दिनांक १८/०७/२०२२ रोजी ग्रा.पं. ने पत्र दिले होते. व मा.सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा .अभि/ (द). ९९३ दिनांक ०८/०८/२०२२ रोजीचे पत्राची सत्यप्रत ग्राम पंचायतला प्राप्त झाले.<br>सदर अर्जाचे व ना.म.प्र.वि.प्रा. यांचे पत्राचे अनुषंगाने ग्राम पंचायत मासिक सभा दिनांक १८/०८/२०२२ ठराव क्र. ८/३ अन्वये सदर अर्जाचे व पत्राचे मासिक सभेमध्ये वाचन करण्यात आले. व पत्रात नमूद आहे की मौजा शंकरपूर ख. क्र. ७६/३ लेआउट मध्ये विकास कामे करण्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत झालेल्या विकास करारनामा मधील अट क्र. १७ नुसार विकासकाने अभिन्यासातील मलवाहिका, पर्जन्यवाहिका , पिण्याची पाण्याची वाहिनी , सीमेंट कॉक्रीट रस्ते , खुल्या जागेस सुरक्षा भिंतीचे बांधकाम व मल – जल शुद्धीकरण संयंत्राचे बांधकाम मंजूर विकास नकाशानुसार पूर्ण केलेले आहे. सदर पत्राचे अधीन राहून पत्रात नमूद बाबीला काम पूर्ण झाले असे मानून शासनाचे अटी व शर्तींच्या आधीन राहून कामाची देखभाल व दुरुस्ती हस्तांतरणानंतर ग्रा.पं. करण्यास तयार आहे. तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे, कर आकारणी करून देणे लेआऊट धारकावर बंधनकारक राहील अन्यथा ले आऊट धारकानांच टॅक्स भरणा करावा लागेल तसेच ले आऊट मध्ये मोक्यावर पूर्ण वसाहत तयार होईपर्यन्त व लेआऊट मालक यांनी सादर केलेल्या १०० रुपयेचा मुद्रांक नंबर १५AA १७०६१८ दिनांक १०/०८/२०२२ चा खरेदी दिनांक ११/०८/२०२२ चा स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेल्या हमीपत्रात नमूद बाबीची देखभाल व दुरूस्ती ले आऊट मालकाची राहील तसेच ना.म.प्र.वि.प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात अभिन्यासामध्ये फ्लॅट स्कीम तयार झाल्या व त्याबाबत काही तक्रारी निर्माण झाल्यास ,भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार /ले आऊट धारक यांची राहील. व त्यांनी ले आऊट मध्ये रहिवास्यांचा आवश्यकतेनुसार / गरजेनुसार नवीन पद्धतीने स्वखर्चाने कामे करून द्यावे लागेल. असे सभेत ठरवून फ्लॅट स्कीम वगळून अभिन्यास हस्तांतरित करण्यास ग्रा. पं. तयार आहे.<br>असे सभेत ठरवून ठराव सर्वानुमते मंजूर. | -- | -- | पास | - | |

सरपंच / सचिव
ग्रामपंचायत वेळा (हरिश्चंद्र)
पं. स. नागपूर.